# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.७

सभावृत्तांत

दिनांक ०२/०९/२०१६ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे सप्टेंबर २०१६ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०२/०९/२०१६ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. टाक अरुण मदन | सभापती |
| २. | मा. पाडाळे निता विलास | सदस्या |
| ३. | मा. तापकीर अनिता मच्छिंद्र | सदस्या |
| ४. | मा. चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ५. | मा. श्री. बोकड रामदास गेणभाऊ | सदस्य |
| ६. | मा. श्रीमती जवळकर वैशाली राहुल | सदस्या |
| ७. | मा. जगताप राजेंद्र गणपत | सदस्य |

------------------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रीय अधिकारी, मा. सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा,मा. संदेश चव्हाण, कार्यकारी अभियंता(विद्युत), मा.नितीन देशमुख ,उपअभियंता विद्युत, मा. शिरीष पोरेडी, प्रभारी कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. विनय ओहोळ, मा. एल. बी. जाधव, उपअभियंता, स्थापत्य, मा. रवींद्र पवार उपअभियंता जलनि:सारण, मा. विजयसिंह भोसले, उपअभियंता ,बांधकाम परवानगी, मा. भाऊसाहेब साबळे, मा. राजेंद्र जावळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. राजेंद्र इंगळे, उपअभियंता, झोनिपू, मा. अजय जाधव, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. ए.टी. घेरडे ,मा. एस.एच. लोखंडे, मा. कलाल आय.के. मा. गजपुरे व्ही.पी., कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. वाकोडे ए.एस.,मा. रोकडे जयवंत, मा. इदे, ए.के. मा. मुलाणी बी.एम. कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. संदिप पाडवी, मा. निलेश दाते, मा. मोरमारे एस.व्ही. मा. कुतवळ, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. चंद्रकांत मुठाळ, मा. आर.बी. जगताप, कनिष्ठ अभियंता, नगररचना, मा. पाडवी व्ही.ए., मा. भालेराव यु.ए., मा. गणेश राऊत, कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. मंगेश शिनगारे, उपलेखापाल, मा. संदीप कोतवडेकर, मा. आर.एम. सौदाई, मा. सरोदे वसंत, मा. एस.ए. पाटील, आरोग्य निरीक्षक, मा. अमर

मद्रासी, मलेरिया निरीक्षक, मा. जी.एन. खैरे, डी.डी. सटाले, उद्यान सहाय्यक, मा. मोहन कदम, अतिक्रमण निरीक्षक, इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सभापती** : सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात करणेत येत आहे. तदनंतर मा. रामदास गेणभाऊ बोकड सदस्य यांनी पुढीलप्रमाणे सुचना मांडली.
दिनांक ०२/०९/२०१६ रोजी ज्येष्ठ कामगार नेते मा. शरद राव यांचे दु:खद निधन झाल्याने दोन मिनिटे उभे राहून श्रध्दांजली वाहुन सभेचे कामकाज सुरु करण्यात यावे.

सदर सुचनेस मा. निता विलास पाडाळे यांनी अनुमोदन दिले.

त्यानुसार सर्व उपस्थित सन्मा. सदस्य व अधिकारी, कर्मचारी यांनी दोन मिनिटे उभे राहुन ज्येष्ठ कामगार नेते मा. शरद राव यांना श्रध्दांजली वाहिली. त्यानंतर सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सभेत सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

सन्मा. सदस्य यांच्या मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. १** : मौजे रहाटणी येथील स.नं. ७३ पैकी जागेतील मंजूर विकास योजनव्यतिरिक्त मु.प्रां.महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत घोषित ९.०० मी. रुंद रस्ता अंतिमत: घोषीत करणेत आलेला आहे. सदर ९.०० मीटर रुंद घोषीत रस्त्याचे आखणीनुसार मौजे रहाटणी येथील स.न. ७३/२ई/१३ व २०, सि.स.नं. ४१६० व ४१६१ पैकी मिळकत रस्ता रुंदीने बाधित होत आहे. तथापि प्रत्यक्ष जागेवर उपलब्ध असलेला रस्ता विचारात घेता व रस्त्याचे दोन्ही केलेल्या बांधकामानुसार रस्त्याची आखणी दुरुस्त करणे आवश्यक आहे. तरी सदर घोषित ९.०० मी. रुंद रस्त्याची आखणी दुरुस्त करणेकामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ नुसार कार्यवाही करणेकामी हरकती व सूचना मागवुन अंतिम निर्णय घेणेकामी तसेच सदरचा विषय पुढील कार्यवाही करणेसाठी व मा. आयुक्त यांना अधिकार पदान करणेबाबतचा विषय मा. ड प्रभाग समिती मार्फत मा. महापालिका सभेची मान्यता मिळणेबाबत

**तदनंतर मा. ड प्रभाग समिती माहे सप्टेंबर २०१६ चे नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.**

**मा. सचिव, सभा शाखा** : :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. ६ माहे ऑगस्ट २०१६ च्या मासिक सभेच्या दिनांक ०५/०८/२०१६ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** : मागील कार्यपत्रिका क्र. ६ माहे ऑगस्ट २०१६ चा सभावृत्तांत कायम करण्यात येत आहे.

माहे सप्टेंबर २०१६ च्या कार्यपत्रिका क्र.७ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. १ ठराव क्र. २०

दिनांक ०२/०९/२०१६ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा. अनिता मच्छिंद्र तापकीर अनुमोदक : मा. वैशाली राहुल जवळकर

संदर्भ : मा. अनिता मच्छिंद्र तापकीर यांचेकडील दि. १७/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४७ मधील सर्व्हे नं. ७३/२ई/१५ मधील साईसदन अपार्टमेंट व मयुर रेसिडेन्सी यामध्ये ९ मीटरपेक्षा अंतर जास्त असल्यामुळे कलम ३७ अंतर्गत रस्ता हलवणेचा प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात येत आहे.

--------------

**मा. सचिव, सभा शाखा** : सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने दिनांक ०२/०९/२०१६ रोजीच्या सभेमध्ये ऐन वेळी दाखल केलेले विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. १ ठराव क्र. २१

दिनांक ०२/०९/२०१६ विभाग: स्थापत्य विभाग

सूचक : मा. अनिता मच्छिंद्र तापकीर अनुमोदक : मा. वैशाली राहुल जवळकर

संदर्भ : मा. अनिता मच्छिंद्र तापकीर यांचेकडील दि. २/९/२०१६ रोजीचा प्रस्ताव

मौजे रहाटणी येथील स.नं. ७३ पैकी जागेतील मंजूर विकास योजनव्यतिरिक्त मु.प्रां.महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत घोषित ९.०० मी. रुंद रस्ता अंतिमत: घोषीत करणेत आलेला आहे. सदर ९.०० मीटर रुंद घोषीत रस्त्याचे आखणीनुसार मौजे रहाटणी येथील स.न. ७३/२ई/१३ व २०, सि.स.नं. ४१६० व ४१६१ पैकी मिळकत रस्ता रुंदीने बाधित होत आहे. तथापि प्रत्यक्ष जागेवर उपलब्ध असलेला रस्ता विचारात घेता व रस्त्याचे दोन्ही केलेल्या बांधकामानुसार रस्त्याची आखणी दुरुस्त करणे आवश्यक आहे. तरी सदर घोषित ९.०० मी. रुंद रस्त्याची आखणी दुरुस्त करणेकामी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ नुसार कार्यवाही करणेकामी हरकती व सूचना मागवुन अंतिम निर्णय घेणेकामी तसेच सदरचा विषय पुढील कार्यवाही करणेसाठी व मा. आयुक्त यांना अधिकार पदान करणेबाबतचा विषय मा. ड प्रभाग समिती मार्फत मा. महापालिका सभेची मान्यता मिळणेबाबतचे प्रस्तावावर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------------

यानंतर मा. सभापती यांचे मान्यतेने सन्मा. नगरसदस्य यांनी विविध विभागांचे कामकाजास अनुसरुन खालील प्रमाणे मत व्यक्त केले.

**आरोग्य विभाग** :

**मा. आरती चोंधे** : कच-याच्या गाडयांचे वेळापत्रक व्यवस्थित नाही. कचरा गाडी दररोज येत नसलेने सदर कामात विस्कळीतपणा दिसुन येतो तसेच कच-याचा प्रश्न गंभीर आहे.

**मुख्य आरोग्य निरीक्षक श्री. गायकवाड :** पिंपळे निलख येथील वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन एक मोठी गाडी मिळणेकामी मागणी दाखल केली होती. त्यानुसार मुख्य कार्यालयाकडून एक गाडी मिळणार आहे.

**मा. निता विलास पाडाळे** : ठराविक ठिकाणी कचरा उचलणेसाठी गाडया जात नाहीत ही वस्तुस्थिती आहे. महिला कचरा वेचकांचे वर्तन उद्धटपणाचे आहे. त्यांचे अशा प्रकारचे गैरवर्तनाबद्दल त्यांचेवर कारवाई होणे आवश्यक आहे. घंटागाडी ठेकेदारांचे काम व्यवस्थित नाही. सदर विषयास मा. सभापती यांनी दुजोरा दिला.

**मा. रामदास बोकड** : प्रभागातील कचरा व्यवस्थापनाचे कामात सुसुत्रता आली आहे व सहा. आरोग्याधिकारी यांचे समन्वयाने नियोजनही व्यवस्थित आहे. तसेच ठेकेदारांकडील सुपरवायजर्सचे काम देखाल योग्य आहे. कच-याचे सध्याचे ठेकेदार बदलुन दुस-या ठेकेदारास काम देणेत यावे.

**मा. निता विलास पाडाळे : स्टॉर्म वॉटर ड्रेन लाईन व्यवस्थित साफ केलेल्या नाहीत याची तपासणी करण्यात यावी.**

**मा.** सहा. आरोग्याधिकारी श्री. बेंडाळे : महिला कचरावेचकांचे वर्तनाबाबत मुख्य कार्यालयास पत्र देणेत आलेले आहे व ठेकेदारांना नोटीस देणेत आली आहे. यापूर्वीच स्टॉर्म वॉटर ड्रेनची सफाई झालेली आहे. त्यावेळेस सदर चेंबर आपणांस दाखविणेकामी उघडून ठेवले होते.

**जलि:सारण विभाग** :

**मा. निता विलास पाडाळे** : जलनि:सारण विभागाकडून एका ठेकेदाराला चार ठिकाणची कामे देणेत आली आहेत परंतु सदर ठेकेदार एकाही ठिकाणचे काम व्यवस्थित पूर्ण करु शकत नाही. ड्रेनेज चोकअपचे मातृछाया कॉलनी येथील काम पूर्ण नाही.

**मा. सभापती श्री. अरुण टाक** : ठेकेदाराने राडारोडा लगेच उचलून घेण्याबाबत त्यांना सूचना देणेत याव्यात.

**उपअभियंता जलनि:सारण श्री. पवार** : संबंधित ठेकेदार यांचेकडून वेळापत्रक मागवून घेणेत येईल तसेच त्यांना कामाची गती वाढविणेबाबत सूचना देणेत येतील.

**अतिक्रमण विभाग** :

**मा. वैशाली जवळकर** :  वैदुवस्ती व सुदर्शनगर या परिसरातील अतिक्रमणांबाबतची कारवाई बंद आहे.

**मा. रामदास बोकड** : प्रभाग क्र. ५६ मध्ये हॉकर्स झोनमध्ये फक्त ५० हातगाडयांचे बायोमेट्रीक पध्दतीने रजिस्ट्रेशन करण्यात आले आहे. उर्वरीत अनधिकृत हातगाडया हया कासारवाडी दापोडी या भागातील असतात तसेच सृष्टी चौक, सुदर्शननगर येथे ९ मीटर रस्त्याचे ठिकाणी टेंपोमधुन फळवाले व भाजीवाले यांचे अतिक्रमणही प्रचंड प्रमाणात असुन सदर अतिक्रमणांवर कारवाई होत नाही. उड्डाणपुलापासुन ते सुदर्शन चौकापर्यंत अतिक्रमणाची कारवाई होत नाही.

**अतिक्रमण विभागाचे कामात सुधारणा होणे आवश्यक आहे. या विषयास मा.** निता पाडाळे यांनीही दुजोरा दिला.

**मा. राजेंद्र जगताप** : १८ मीटर रस्त्यावरील अतिक्रमणांबाबत काहीही कारवाई अद्याप झालेली नाही. फुटपाथ, पार्कींग हया ठिकाणी करण्यात आलेले अतिक्रमण काढून टाकावे.

**क्षेत्रीय अधिकारी श्री.** चंद्रकांत खोसे : पिंपळे गुरव व वैदूवस्ती या परिसरातील अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करणेत येईल.

**निविदा कामकाजाबाबत** :

**मा. निता विलास पाडाळे** :कोणकोणत्या कामांचे आदेश देणेत आले आहेत याबाबतची माहिती मिळावी. पेव्हर ब्लॉक दुरुस्तीचे किरकोळ काम होत नाही तरी लवकरात लवकर कामांचे आदेश देणेची कार्यवाही करण्यात यावी.

**मा. क्षेत्रीय अधिकारी श्री. चंद्रकांत खोसे** :  स्थापत्य विभागाची एकूण १०१ कामे असुन ६७ कामांच्या निविदा उघडण्यात आल्या असुन, पाणीपुरवठा विभागाची ११ कामे असुन ८ कामांच्या निविदा उघडण्यात आल्या आहेत व विद्युत विभागाची १९ कामे असुन १२ कामांच्या निविदा उघडण्यात आल्या आहेत. मा. स्थायी समितीकडे सीलसाठी पाठविलेल्या कामांची संख्येची माहिती अलाहिदा देणेत येईल.

**क्षेत्रीय अधिकारी श्री. चंद्रकांत खोसे : मा.** राज्य निवडणूक आयोगाकडून दिनांक १५/९/२०१६ ते दिनांक १४/१०/२०१६ या कालावधीमध्ये सर्व महापालिकांमधुन व महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदार संघ स्तरावर मतदार नोंदणीची विशेष पुनरिक्षण मोहिम राबविणेबाबत सूचना केलेल्या असुन सदर सुचनास अनुसरुन महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तसेच मनपा कार्यक्षेत्रातील सर्व विधानसभा मतदार संघाच्या मतदान केंद्रांच्या पदनिर्देशित ठिकाणी मतदारांकडून मतदार नोंदणी विषयक स्वीकृतीसाठी मतदार सहायता केंद्र स्थापन करण्यात आले आहे. त्यानुसार ड क्षेत्रीय कार्यालय येथे सदर केंद्र सुरु करण्यात आले आहे. त्यामध्ये  शहरातील मतदारांकडून नवीन मतदार नोंदणी, नाव व तपशील दुरुस्ती, स्थलांतर, मयत,दुबार, वगळणी विषयक अर्ज स्वीकारण्यात

येत आहेत. या मोहिमेमध्ये जास्तीत जास्त पात्र मतरारांचा मतदार यादीमध्ये समावेश व्हावा या साठी विविध माध्यमांद्वारे जनजागृती करण्याचे कामकाज निवडणूक विभागामार्फत करण्यात येत आहे. त्याचा एक भाग म्हणुन या विशेष मोहिमेंतर्गत दिनांक १८ सप्टेंबर २०१६ रविवार व दिनांक ९ ऑक्टोबर २०१६ रविवार रोजी ड क्षेत्रीय कार्यालय तसेच सर्व विधानसभा मतदार संघाच्या मतदान केंद्रांच्या पदनिर्देशित ठिकाणी ही मोहिम राबविण्यात येणार आहे. त्यामध्ये आपले प्रभागातील पात्र मतदार आपले नाव मतदार यादीमध्ये नोंदवू शकतात याची कृपया सर्व सन्मा. सदस्यांनी नोंद घ्यावी व आपले प्रभागातील पात्र मतदारांना मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करणेकामी आवाहन करावे.

**सन्मा.सभापती श्री. अरुण मदन टाक व सन्मा. सदस्या श्रीमती निता पाडाळे** यांनी गणपती विसर्जनाचे संदर्भात महापालिकेकडून करण्यात येत असलेल्या विविध कामांबाबत सूचना केल्या . त्यास अनुसरुन क्षेत्रीय अधिकारी यांनी गणपती विसर्जनासाठी घाटांची दुरुस्ती व जीवरक्षक यांचे संदर्भातील माहिती सन्मा. सदस्यांना दिली.

**मा. सभापती** : ड प्रभाग समिती यांनी मा. निवडणूक आयोगाकडून प्राप्त सूचनांनुसार विशेष मोहिमेत सहभागी होणेकामी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करुन सर्व अधिकारी व कर्मचारी यांना गणपती विसर्जनाचे अनुषंगाने आरोग्य, व स्वच्छता विषयक कामकाज व्यवस्थित करणेबाबत, सन्मा. नगरसदस्य यांनी दिलेल्या सूचनांनवर सर्व उपस्थित अधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत सूचना देऊन सर्व उपस्थितांचे आभार मानुन माहे सप्टेंबर २०१६ ची बैठक संपलेचे जाहीर करतो.

सही/-
( अरुण मदन टाक )
**सभापती**
ड प्रभाग समिती, ड क्षेत्रीय कार्यालय,
रहाटणी - १७

सही/-
( सीताराम बहुरे )
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/२७८/२०१६
दिनांक –२२ /०९/२०१६